महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०३ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

* आंतरराष्ट्रीय मातृभाषादिन.

१८२९ : राणी चेन्नम्मा यांचा मृत्यू.
१८९४ : शांतीस्वरुप भटनागर यांचा जन्म झाला.
१८९९ : कवी निराला त्रिपाठी यांचा जन्म झाला.
१९१३ : सेनापती व बंगालचे क्रांतिकारक वीरेंद्रनाथ यांचा यांना दिवशी फाशी दिली.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८२,८१४.७१ +३१६.५७ (०.३८%) |
| डॉलर | ₹ ९०.९८ |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३६ | २३ |
| दिल्ली | २७ | १५ |
| मुंबई | ३६ | २२ |
| नागपूर | ३२ | १८ |
| पुणे | ३४ | १५ |

## सुविचार

जगणे म्हणजे शिकणे; प्रत्येक दिवस आपल्याला काही ना काही नवीन शिकवतो.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:५४ | संध्या-६:२९ |

**सोने - चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५९,२८०/- | २,७०,०००/- |

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# आपण जितके निसर्गाशी जोडले जाऊ, तितके सुखी, निरोगी राहू : राज्यपाल

**'मुंबई क्लायमेट वीक' या तीन दिवसीय उपक्रमाच्या सांगता समारंभात आचार्य देवव्रत यांचे मत**



वृत्तसंस्था । मुंबई

**निसर्गाच्या जवळ राहणाऱ्या प्राण्यांना कधीही औषधोपचारांची गरज पडत नाही. जंगलातील पशु पक्षी किंवा खोल समुद्रातील मासे हे निसर्गाच्या सानिध्यात राहत असतात आणि निसर्गाने ठरवून दिलेले अन्न खात असतात. आपण मूळ भारतीय संस्कृतीनुसार निसर्गाशी जोडलेले राहायला हवे, आपण जितके निसर्गाशी जोडले जाऊ, तितके सुखी आणि निरोगी राहू, असे मत महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गुरुवारी व्यक्त केले.**

वांद्रे येथील जिओ कन्विशनल वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'मुंबई क्लायमेट वीक' या तीन दिवसीय उपक्रमाची सांगता गुरुवारी झाली. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आपले विचार व्यक्त केले.

चंगळवादी प्रवृत्तीमुळे पर्यावरणाची हानी होत आहे. आपण आपल्या स्वार्थासाठी पर्यावरणाचा नाश करत आहोत, चंगळवादी प्रवृत्तीपेक्षा निरोगी आरोग्य महत्त्वाचे असून त्यासाठी आपण आपल्या मूळ भारतीय संस्कृतीनुसार निसर्गाशी जोडलेले राहायला हवे,, असेही मत त्यांनी व्यक्त केले. सेंद्रिय शेती आणि आरोग्य याविषयी बोलताना राज्यपाल म्हणाले की, या पृथ्वीवर असंख्य जीव आहेत. पण त्या सर्वच जीवांसाठी रुग्णालये, डॉक्टरांची व्यवस्था आणि औषधांची दुकाने नाहीत, तरीही ते जीव निरोगी आहेत.

निसर्गाशी एकरूप होऊन जगतात. मात्र, माणसांच्या सान्निध्यात आलेले गाढव, कुत्रा, घोडा, बकरी आणि गाय यांसारखी जनावरे मात्र आजारी पडतात. आकाशात मुक्त विहार करणारे पक्षी किंवा खोल समुद्रात राहणारे मासे क्वचितच आजारी पडतात. आपण कधी एखाद्या गायीला चष्मा लावलेला पाहिला आहे का ? किंवा घोडा टूथपेस्टने दात घासत आहे असे पाहिले आहे का ? नाही. कारण ते निसर्गाने ठरवून दिलेले अन्न खातात. माणूस मात्र, रासायनिक खतांवर पिकवलले, कीटकनाशके फवारलले अन्न खातात. यामुळे गंभीर आजारात वाढ झाली असून सर्वांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याची गरज आचार्य देवव्रत यांनी यावेळी व्यक्त केली.

### पर्यावरणाचे रक्षण करणे ही सामूहिक जबाबदारी

आपण निसर्गापासून दूर जात आहोत. यामुळे आपल्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. निसर्ग संवर्धनाबाबत आता सावध झालो नाही, तर येणाऱ्या काळात आपल्याला गंभीर प्रश्नांना सामोरे जावे लागेल, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले. यावेळी त्यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगतानाच शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा वापर करण्याचा संदेश दिला.

# सरकारी कामे होणार ६ दिवसांत 'महाराजस्व अभियान' जाहीर

वृत्तसंस्था । मुंबई

**महसूलमंत्री दररोज करणार मॉनिटरिंग**



**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान जाहीर केले असून, हे अभियान राज्यातील सर्व मंडल तसेच नगरपालिका, नगरपंचायतीच्या क्षेत्रात पुढच्या दोन महिन्यात सहा दिवस घेतले जाणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. विशेष म्हणजे, महसूलमंत्र्यांच्या देखरेखीखाली या अभियानाची राज्यस्तरीय अंमलबजावणी दररोज होणार आहे.**

यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या नियुक्त करण्यात आल्या आहेत. तसेच महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महसूल राज्यमंत्र्यांसह विधान परिषदेचे दहा आमदार राज्यस्तरीय समितीचे सदस्य आहेत. अभियानातील समित्यांना संपूर्ण राज्याचा आढावा, वेळापत्रक, धोरणात्मक निर्णय, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अर्जदारांच्या यादीचे निरीक्षण, डेटा मॉनिटरिंग, जबाबदारी निश्चिती आणि अभियानाचा दर पंधरवड्याला प्रगती अहवाल तपासण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय जारी केल्यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि महिलांसाठी असलेल्या महसूल विभागातील महत्वाच्या १५ स्वरुपातील सेवा एकाच दिवसात मार्गी लावल्या जाणार आहेत.

त्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा-१)' राबविण्याचा निर्णय घेतला असून राज्यातील सर्व महसूल मंडल आणि नगर परिषद, नगर पंचायत स्तरावर भव्य शिबिरे भरवली जाणार आहेत.

# एसटी प्रवाशांना सवलतींसाठी आता एनसीएमसी कार्ड बंधनकारक

**अन्यथा तिकिटाचे पैसे द्यावे लागणार**

वृत्तसंस्था । पुणे




आधार कार्ड किंवा साधे ओळखपत्र दाखवून निम्म्या तिकिटात प्रवास करणाऱ्या महिला आणि शंभर टक्के सवलतीचा आनंद घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना आता सवलतीच्या प्रवासासाठी 'नॅशनल कॉमन (पान २ वर)

**असे वापरायचे कार्ड...**

- प्रवाशांना एनसीएमसी कार्डसाठी १९९ रुपये मोजावे लागणार आहेत.
- जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास सवलतीच्या दरात म्हणजेच १४९ रुपयांत नवीन कार्ड दिले जाणार आहे.
- हे कार्ड केवळ ओळखपत्र नसून ते एक प्री-पेड वॉलेट असेल.
- यामध्ये किमान १०० रुपयांचा बॅलन्स ठेवणे बंधनकारक असून, प्रवाशांना ५० रुपयांच्या पटीत ते रिचार्ज करता येईल.

## थोडक्यात

### फ्रान्सकडून भारताला महागात; इंडोनेशियाला स्वस्तात राफेल जेट विक्री ?

**दिल्ली ।** भारत आणि फ्रान्सच्या राफेल फायटर जेट कराराची तुलना इंडोनेशियाच्या मागील राफेल खरेदीशी केली जात आहे. २०२२ मध्ये जकार्ताने प्रबोवो सुबियांतो यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये फ्रेंच कंपनी डसॉल्ट एव्हिएशनकडून ४२ विमाने खरेदी केली होती. इंडोनेशियाच्या राफेल कराराची किंमत ८.१ अब्ज डॉलर्स (सुमारे ६८,००० कोटी रुपये) होती. त्यानुसार प्रत्येक विमानाची किंमत सुमारे १,७४७ कोटी रुपये होती. भारताच्या करारात प्रत्येक विमानाची किंमत अंदाजे २,८५० कोटी रुपये असेल. किमतीतील या फरकामुळे भारत त्याच विमानांसाठी जास्त पैसे का देत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



### कराचीत गॅस सिलिंडरच्या भीषण स्फोटात १६ ठार

**इस्लामाबाद ।** पवित्र रमझान महिन्याच्या पहिल्याच दिवशी पाकिस्तानातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. कराचीमधील सोल्जर बाजार परिसरात सेहरीसाठी जेवण बनवत असताना गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, निवासी इमारतीचा काही भाग कोसळला. या भीषण दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये ८ निष्पाप बालकांचा समावेश आहे.

# नाशिक कुंभमेळ्यावर ४०११ कॅमेरे अन् १८ ड्रोन्सची नजर!

वृत्तसंस्था । नाशिक

**सिंहस्थ कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविकांच्या गर्दीतील हालचालींवर नजर ठेवण्यासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित ४०११ अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे आणि १८ टेहळणी ड्रोनचे विशाल नेटवर्क तयार करण्यात येत आहे. या नव्या प्रारूपाद्वारे चित्रीकरणाचे 'रिअल-टाइम' विश्लेषण करून महत्त्वाच्या घटनांची ओळख पटवली जाईल, जेणेकरून सुरक्षेच्या दृष्टीने माणसांची हालचाल, गर्दीचे व्यवस्थापन, संशयास्पद घटना आणि वाहतूक नियंत्रण आदी बाबी साध्य केल्या जाणार आहेत.**




प्रयागराजनंतर होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील कुंभमेळ्यात ६ ते ७ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. हिंदू धर्मीयांचा सर्वात मोठा सोहळा गोदावरी काठावर अतिशय दाट वस्तीच्या भागात होतो. त्यामुळे कुंभमेळ्यात गर्दीचे व्यवस्थापन हे यंत्रणांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. (पान २ वर)

### ३०० कोटींचा 'एआय' मास्टरप्लॅन सज्ज

नाशिक शहर व त्र्यंबकेश्वरमध्ये ४०११ सीसीटीव्हीचे जाळे उभारले जात असून या प्रणालीत ड्रोनचाही समावेश आहे. सर्व कॅमेरे बसविण्याचे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पुढील काळात ड्रोन देखरेख, माहितीचे विश्लेषण आणि मध्यवर्ती कमांड सेंटरशी संलग्न करून एकात्मिक प्रणाली कार्यान्वित करण्याचे टप्पे पार पडतील. कुंभमेळ्यात गर्दीचे नियंत्रण करण्यास ही प्रगत प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**- शेखर सिंग**
आयुक्त,
(नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण)

### जन्म-मृत्यूची नोंदणी २१ दिवसांत करणे बंधनकारक

**वृत्तसंस्था । अमरावती**


जन्म किंवा मृत्यूची घटना घडल्यापासून २१ दिवसांच्या आत त्याची अधिकृत नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. विहित मुदतीत नोंदणी न केल्यास भविष्यात अनेक कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी माहिती आरोग्य विभागामार्फत देण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी नागरिकांना ही प्रक्रिया गांभीर्याने घेण्याचे आवाहन केले आहे. शासन निर्णय आणि जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ नुसार, २१ दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी केल्यास प्रमाणपत्र मोफत मिळते. यामुळे नागरिकांना विनाकारण विलंब शुल्क किंवा दंडाचा भुर्दंड सोसावा लागणार नाही.

# युजीसीची मोठी कारवाई! ३२ बनावट विद्यापीठे जाहीर

**महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश; विद्यार्थ्यांनी राहावे सावध**

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**देशात शिक्षणाच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. देशातील बनावट विद्यापीठांचे जाळे आता १२ राज्यात पोहचले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश आहे. तर दिल्लीतील तब्बल १२ विद्यापीठांचा समावेश (दिल्लीमधील १० तर नवी दिल्लीतील २ विद्यापीठे) या बनावट विद्यापीठांच्या यादीत आहे. या यादीनुसार उत्तरप्रदेश राज्यात दिल्लीनंतर सर्वाधिक ४ बनावट विद्यापीठे आहेत. गेल्या दोन वर्षांत देशातील अशा संस्थांची संख्या २० वरून ३२ झाली आहे. त्यामुळे**




**विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थी आणि पालकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. तसेच प्रवेश घेताना काळजी घेण्याचे आवाहनही केले आहे.**

या नवीन आकडेवारीनुसार बनावट विद्यापीठांचे जाळे नवीन चार राज्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामध्ये हरियाणा राजस्थान, झारखंड आणि अरुणाचल प्रदेश राज्यांचा समावेश आहे. धक्कादायक बाब म्हणजे ३२ बनावट विद्यापीठांपैकी तब्बल १२ एकट्या दिल्लीत कार्यरत आहेत. विशेष म्हणजे त्यातील काही संस्था (पान २ वर)

### महाराष्ट्रातील दोन विद्यापीठ बनावट

या बनावट यादीत महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश आहे. त्यामध्ये राजा अरबी विद्यापीठ नागपूर आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठाचा समावेश आहे. देशातील बनावट संस्था किंवा विद्यापीठे परदेशी विद्यापीठांची नावे आणि लोगो वापरून स्वतःला वैध ठरवण्याचा प्रयत्न करतात. अलीकडेच, कोलंबिया विद्यापीठाने यूजीसीला पत्र लिहून तक्रार केली आहे की महाराष्ट्रात त्यांचे नाव आणि लोगो वापरून एक बनावट विद्यापीठ कार्यरत आहे. त्यानंतर, यूजीसीने पुन्हा विद्यार्थी आणि पालकांना इशारा दिला.

# परळीच्या तहसिलदाराला शेतकऱ्याकडून लाच घेताना रंगेहाथ पकडले

वृत्तसंस्था । बीड

**जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत परळी येथील तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना शेतकऱ्याकडून लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे परळी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.**



तक्रारदार शेतकऱ्याकडून सोलंसी (ऐपतीचे) प्रमाणपत्र देण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याची माहिती असून तडजोडीनंतर २० हजारांवर सौदा ठरल्याचे समोर आले आहे. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर (पान २ वर)

## संपादकीय

### व्यापार कराराचा फटका

अमेरिका–भारत व्यापार करारामुळे अमेरिकन उत्पादनांची भारतीय बाजारातील आयात वाढू शकते, ज्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांवर स्पर्धा आणि उत्पन्नाचे दडपण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ट्रम्प प्रशासनाच्या नवीन १८ टक्के (आणि काही बाबतीत २५टक्क्यांपर्यंत) आयात शुल्कामुळे भारत–अमेरिका व्यापार करारांतर्गत भारतीय कृषी आणि दुग्धजन्य पदार्थ क्षेत्रावर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे कृषी क्षेत्र. आजही अंदाजे ५०% लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. तर भारताच्या जीडीपीमध्ये १८% वाटा कृषी क्षेत्राचा आहे. उद्योग आणि सेवा क्षेत्र कृषिक्षेत्रावर कच्चा मालासाठी अवलंबून आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांना कृषीशी निगडित जोडधंद्यांमधून उत्पन्न मिळत असते. भारत–अमेरिका व्यापार करारामुळे भारतातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात अमेरिकन शेती उत्पादनांची शून्य शुल्कात निर्यात होणार असल्याचं अमेरिकेनं स्पष्ट केले आहे. यामुळे भारतातील सोयाबीन, कापूस या पिकांसह दुग्धजन्य पदार्थ आणि पोल्ट्री उद्योगाच्या उत्पादनावर याचा मोठा परिणाम होणार असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. व्यापार करार अजून नेमका काय झाला आहे हे भारताकडून स्पष्ट व्हायचे बाकी आहे. मात्र, या कराराचा परिणाम सोयाबीन, कापूस यांसारख्या पिकांवर आणि पोल्ट्री उद्योगांवर होणार आहे. परंतु या करारामुळे अमेरिकेतून भारतात होणाऱ्या आयातीवर शून्य टक्के आयात कर असल्यामुळे अमेरिकेतील अनुदानानं स्वस्त झालेले आणि विकसित तंत्रज्ञानामुळे प्रतिहेक्टरी उत्पादन अधिक असलेले सर्व प्रकारचे शेतीमाल भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आयात होतील. दुसऱ्या बाजूला भारतातून अमेरिकेला शेतीमालाची आयात करण्यासाठी १८ टक्के शुल्क असणार आहे. त्यामुळे भारतातून अमेरिकेत शेतीमाल निर्यात करण्याला आता मर्यादा येतील. सोयाबीन–अमेरिकेला सोयाबीन आता भारतात निर्यात करायचं आहे आणि अमेरिकेमधून येणारं सोयाबीन हे अत्यंत स्वस्त दरात भारतातील बाजारपेठेत उपलब्ध होईल. अमेरिका हा जगातील सोयाबीन उत्पादनात अग्रेसर असणारा देश आहे. प्रामुख्याने जीएम प्रकारचे सोयाबीन उत्पादन अमेरिकेत मोठ्या प्रमाणात होतेण त्यामुळे या सोयाबीनला जागतिक स्तरावर खुली बाजारपेठ आवश्यक आहे. मात्र, भारतात जीएम सोयाबीन उत्पादन करण्यास बंदी घालण्यात आली होती. तसेच चीन आणि अमेरिका यांच्यात सुरू असणाऱ्या टॅरिफ वॉरमुळे अमेरिकेचे सोयाबीन चीनने घेण्यास नकार दिला आणि इतर खरेदीदार शोधून खरेदी करण्याची भूमिका चीनने घेतली. त्यामुळे अमेरिकेत जीएम प्रकाराचे असणारे सोयाबीन उत्पादनाचे काय करायचे असा प्रश्न अमेरिकेसमोर होता. हा प्रश्न भारतासोबत झालेल्या कराराने सोडवला आहे; पण भारतातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे अमेरिकेतील जीएम सोयाबीन आता भारतातील बाजारपेठेत खुले करून दिले तर भारतातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक हानी सोसावी लागणार आहे. संपूर्ण २०२५ मधील निर्यात ३.१ अब्ज डॉलर्सच्या वर पोहोचण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी वर्तवली आहे, जी आतापर्यंतची उच्चांकी पातळी असेल. दुसरीकडे, अमेरिकेत भारतीय शेती उत्पादनांची आयात केवळ ५.१ टक्क्याने वाढली आहे, जी जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ मधील ५.६२ अब्ज डॉलर्सवरून जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ मध्ये ५.९१ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. अमेरिकेची भारतासोबतची कृषी व्यापार तूट त्या अनुषंगाने ३.५ अब्ज डॉलर्सवरून ३.१ अब्ज डॉलर्सवर आली आहे. जरी काही अहवालानुसार, भारतीय कृषी निर्यातीत वाढ झाली असली तरीही उच्च शुल्कामुळे अमेरिका किंवा इतर जागतिक बाजारपेठेत भारतीय शेतीमालाची स्पर्धात्मकता कमी होण्याची जोखीम आहे.

# पिंपळगाव खुर्दमध्ये माकडाचा धुमाकूळ

## १५ दिवसांत ३५ जण जखमी, ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण

प्रतिनिधी । वरणगाव

**भुसावळ तालुक्यातील पिंपळगाव खुर्द येथे गेल्या १५ दिवसांपासून एका माकडाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून, संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. या माकडाने आतापर्यंत तब्बल ३५ ग्रामस्थांवर हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. माकडाच्या या हिंसक रूपामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले असून, वनविभागाच्या संथ कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.**



माकडाच्या हल्ल्याची तीव्रता इतकी भीषण आहे की, एका ग्रामस्थाला माकडाने घराच्या गच्चीवरून ढकलून दिले. यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर भुसावळ येथील खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याशिवाय अन्य ३५ जण या माकडाच्या चाव्यामुळे जखमी झाले आहेत.

याबाबत माहिती अशी की, काही दिवसांपूर्वी पिंपळगाव परिसरात माकडांची एक टोळी आली होती. त्यातील इतर माकडं निघून गेली असली, तरी एक माकड गावातच थांबले आहे. हे माकड आता हिंसक झाले असून, घरात घुसून महिला आणि वृद्धांवर अचानक झडप घालत आहे. इतकेच नव्हे तर स्वयंपाक घरातील वस्तूंची नासधूस करून हे माकड मोठे नुकसान करत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

या संकटामुळे गावकरी दिवसाही घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत. पालकांनी भीतीपोटी मुलांना शाळेत पाठवणे बंद केले असून, शेतमजुरांनी शेतात जाणे टाळले आहे. आता प्रशासनाने या प्रकरणी गांभीर्याने लक्ष देऊन गावकऱ्यांना या त्रासातून मुक्त करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

## वाहन पार्किंगवरुन झाला वाद; पोलीस अधिकाऱ्याची उचलबांगडी

प्रतिनिधी । चाळीसगाव

**चाळीसगाव शहरात वाहन पार्किंग करण्याच्या कारणावरुन शिवभक्तांसह सहाय्यक पोलीस निरीक्षकांमध्ये शाब्दिक वाद झाला. यावेळी शिवभक्तांनी तुम्ही दादागिरी करीत आहात का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सपोनि भरत चौधरी यांनी हो, मी करणार दादागिरी, असे म्हटल्यामुळे त्यांच्यातील वाद अधिकच वाढला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या घटनेची गंभीररित्या दखल घेत पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी सपोनि भरत चौधरी यांची तात्काळ नियंत्रण कक्षात उचलबांगडी करण्यात आली.**

चाळीसगाव रेल्वे स्थानक परिसरात शक्तीग्रुपतर्फे शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा येथे बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहने पार्किंगच्या कारणावरुन काही शिवभक्तांसह बंदोबस्तासाठी तैनात असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत चौधरी यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्यांच्यातील वाद वाढतच गेल्याने याठिकाणी मोठ्याप्रणात शिवभक्त जमा होवून त्यांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे काही काळ परिसरात ताणावाचे वातावरण होते. शिवप्रेमी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्यातील वाद वाढत असल्यामुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमितकुमार मनेळ यांनी मध्यस्ती करीत शिवप्रेमींची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी शिवप्रेमींनी पोलिसांनी दादागिरी करावी, परंतु, ती गुंड आणि गुन्हेगारांवर करावी, जनतेवर नाही, असे म्हणत रोष व्यक्त केला.


## भुसावळात दोन दिवशीय भिक्खुणी महिला संघ धम्म परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी । भुसावळ

भुसावळ तालुका बौद्ध महासंघाच्यावतीने शहरात प्रथमच भिक्खुणी संघ धम्म परिषद दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत शहरातील कृष्णचंद्र सभागृह रेल्वेस्टेशन भुसावळ येथे आयोजन केले आहे.

या दोन दिवशीय धम्म परिषद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुज्य. भिक्खुणी साक्य धम्मदिन्ना आहेत. या दोन दिवशीय समाज बांधवांना विशेष धम्मदेसना देण्यासाठी पुज्य नागकन्या थेरी अय्याजी, पुज्य विनय शिला थेरी अय्याजी, पुज्य. उप्पलवना थेरी अय्याजी, पुज्य सुजाता थेरी अय्याजी, पुज्य शर्मनेरी रुपासरी, पुज्य कुंडलकेशा अय्याजी यांचे भिक्खुणी संघाला प्रवचन लाभणार आहे. या कार्यक्रमाचा सर्व समाज बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भुसावळ तालुका बौद्ध महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. यशस्वीतेसाठी भिमराव साळुंके, सुरेश पहेलवान, यशोदे सुरेंद्र रामटेके, सुधाकर सोनवणे, अशोक शिंदे, दिपक नन्नवरे, विशाल सोयंके, राहुल कुचेकर, संदेश शिंदे, गजानन निंबाळकर, महेश सपकाळे, सुनील आराक, सचिन गायकवाड, धम्मीका इंगळे, अजय इंगळे यांच्यासह समाज बांधव परिश्रम घेत आहेत.

### आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन



धुळे– आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्ताने धुळे महानगरपालिका सभागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महापौर मायादेवी परदेशी, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, महादेव परदेशी, लेखापाल चंद्रकांत मोरे, निवडणूक अधीक्षक मनीष शेंद्रे, मनीष चंद्रात्रे, कैलास मासाळ, नंदू सोनवणे, योगिता घोडके आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरुन

**नाशिक कुंभमेळ्यावर......**

२००३–०४ मधील कुंभमेळ्यात नाशिकमध्ये शाही मिरवणुकीवेळी चेंगराचेंगरी होऊन ३० भाविकांना प्राण गमवावे लागले होते. २०१५ मधील कुंभमेळ्यात दक्षता घेतल्याने कोणतीही दुर्घटना घडली नाही. आगामी कुंभमेळ्यासाठी आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे व ड्रोनच्या मदतीने अनोखे प्रारूप कार्यान्वित होणार आहे. एकूण ४०११ कॅमेऱ्यांपैकी तीन हजार कॅमेरे नाशिक शहरात तर ७०० कॅमेरे त्र्यंबकेश्वरमध्ये बसविले जातील. उर्वरित कॅमेरे वाहनतळ आणि गर्दी होऊ शकणाऱ्या अन्य ठिकाणी कार्यान्वित होणार आहेत. या प्रणालीचे नुकतेच त्र्यंबकेश्वर येथे प्रात्यक्षिक पार पडले. या माध्यमातून प्रणालीची कार्यक्षमता, विश्लेषणातील अचूकता, प्रतिसाद वेळ आणि एकात्मिक समन्वय क्षमता तपासण्यात आली. त्र्यंबकेश्वर येथील मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार, उत्तर व गायत्री दरवाजा, पोलीस ठाण्याचा परिसर तसेच मुख्य रस्त्यावर विविध प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून गर्दीवर देखरेख व व्यवस्थापन करण्यात आले. प्रणालीने भाविकांची उच्च घनता ओळखून सतर्कतेचे संदेश दिले. यामध्ये त्र्यंबकेश्वर मंदिरातील दर्शन रांगेच्या व्यवस्थापनाचाही समावेश होता. या प्रणालीची चेहरा ओळखणे, अनधिकृत प्रवेश, आग व धूर शोधणे आणि अनुचित प्रकार शोधणे आदी क्षमता आहे. चाचणीवेळी प्रणालीने अशा घटना निदर्शनास आणून दिल्या. ड्रोन टेहळणीतून रिअल–टाइम माहितीचे विश्लेषण करण्यात आले. सीसीटीव्ही कॅमेरा व ड्रोनद्वारे मिळणारी माहिती ‘कमांड अँड कंट्रोल’ केंद्राला प्राप्त होते. त्या आधारे विभागनिहाय कार्यान्वित होणाऱ्या सार्वजनिक संदेश प्रणालीचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

**युजीसीची मोठी कारवाई!......**

यूजीसी मुख्यालयापासून काही मीटर अंतरावर आहेत. नवीन आकडेवारीनुसार, दिल्लीत १२, उत्तर प्रदेशात ४ तर केरळ, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात प्रत्येकी २, तर हरियाणा, राजस्थान झारखंड आणि अरुणाचल प्रदेशात प्रत्येकी एक बनावट विद्यापीठे आढळून आली आहेत.लहान खेड्यांपर्यंत पसरल्या बनावट संस्था – जर एखादा विद्यार्थी कुठे प्रवेश घेत असेल तर त्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर जाऊन बनावट विद्यापीठांची यादी तपासावी, असे आवाहन यूजीसीने विद्यार्थी आणि पालकांना केले आहे. तर दुसरीकडे यूजीसी फक्त बनावट विद्यापीठांची यादी जाहीर करते पण त्यावर प्रभावी कारवाई करत नाही, असा आरोप करण्यात येत आहे. बनावट विद्यापीठे आता मोठ्या शहरांपासून लहान शहरे आणि खेड्यांमध्ये पसरली आहेत. दरवर्षी हजारो विद्यार्थी या फसवणुकीला बळी पडतात, त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातो. या संस्थांमधून मिळालेल्या पदव्या वैध नाहीत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येते.

**परळीच्या तहसिलदाराला......**

एसीबी पथकाने सापळा रचला. उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आज दुपारी ४ वाजेच्या सुमारास तहसीलदारांना लाच स्वीकारताना ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, तक्रारदाराच्या हालचालींवर संशय आल्याने तहसीलदारांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचेही सांगण्यात येत आहे. तरीही एसीबीने आवश्यक पुरावे गोळा करत पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

या घटनेमुळे परळी तालुक्यातील महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. संबंधित अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. भ्रष्टाचाराविरोधातील या कारवाईमुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून प्रशासनात पारदर्शकता राखण्यासाठी अशी कठोर पावले आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**एसटी प्रवाशांना सवलतींसाठी......**

मोबिलिटी कार्ड’ (एनसीएमसी) अनिवार्य करण्यात आले आहे. या कार्डशिवाय आता सवलतीची लालपरी गाठणे कठीण होणार आहे. खिशात कार्ड नसेल, तर प्रवासासाठी पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे सुरुवातीला तरी प्रवाशांना त्रास सहन होणार आहे. या कार्डमुळे प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पूर्णपणे पारदर्शक होणार असल्याचा दावा केला जात आहे. सवलतीची अचूक नोंद, रोखविरहित व्यवहार आणि पारदर्शक प्रतिपूर्ती ही तिन्ही वैशिष्ट्ये एकाच कार्डमध्ये असतील. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या पुढाकारातून हा बदल करण्यात आला आहे. शिवाय कॅशलेस प्रवासाला चालना देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

# ग्रामीण भागातील नेमबाजांची गरुडझेप

## मुंबई ओपन विभागीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी लक्ष्य सिद्धीचे खेळाडू रवाना

प्रतिनिधी । पारोळा

**जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ग्रामीण भागातील खेळाडूंनी पुन्हा एकदा आपले लक्ष अचूक साधले आहे. पारोळ्यातील लक्ष्य सिद्धी रायफल शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंची मुंबई विभाग स्तरावरील खुल्या रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून, गावातून त्यांना उत्साहात निरोप देण्यात आला.**



या स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू पुढीलप्रमाणे – योगेश चौधरी, विवेक पाटील, नैतिक जैन, हेमकांत चव्हाण, सोहम बागुल आणि योगेश चौधरी (एनसीसी). नुकत्याच पार पडलेल्या निवड चाचणीत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत ही संधी मिळवली आहे.

ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सरावाची संधी मिळावी, यासाठी अशोक महादू विसपुते यांनी अकॅडमीत राष्ट्रीय पातळीवरील अद्ययावत साधने व रायफल्स उपलब्ध करून दिल्या आहेत. मुख्य प्रशिक्षक रोहित अशोक विसपुते (एनआयएस कोच) यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी कसून सराव केला असून त्यांच्या मेहनतीचे फळ या निवडीद्वारे दिसून आले आहे.

स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वी खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजसेवक मनोज जगदाळे, नगरसेवक अमृत चौधरी, संदीप पाटील सर, सतीश वाघ, डॉ. प्रा. प्रफुल ठाकरे आदींनी गावाचे नाव उंचावून विजयी होऊनच परत या, अशा शब्दांत शुभेच्छा दिल्या.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, क्रीडाप्रेमी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाले की ग्रामीण भागातील टॅलेंट काय करू शकते, हे या खेळाडूंनी सिद्ध केले आहे, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या.

## पाचोरा तालुक्यात १३ केंद्रांवर शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा होणार

प्रतिनिधी । पाचोरा

पाचवी आणि आठवी विद्यार्थ्यांची शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा दि. २२ फेब्रुवारी रोजी पाचोरा तालुक्यातील तेरा केंद्रावर होणार आहे. गटशिक्षणाधिकारी विजय पवार व अधीक्षक सरोज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सदर परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात आल्याचे शिक्षण विभागाने कळवले आहे. इयत्ता पाचवीसाठी एक हजार दोनशे बासष्ठ आणि आठवीसाठी सहाशे एकोणसत्तर असे एकूण एक हजार नऊशे एकतीस विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षा नियंत्रणसाठी प्रत्येक केंद्रावर भेटीचे नियोजन करण्यात आले आहे. शिष्यवृत्ती परीक्षा कामकाजासाठी गटशिक्षणाधिकारी विजय पवार, शापोआ अधीक्षक सरोज गायकवाड, गिरीष भोयर, सुनील शिवदे, नूर खान, राकेश धायबर तसेच सर्व केंद्र प्रमुख कार्यवाही करत आहेत. मिशन स्कॉलरशिप उपक्रम अंतर्गत यावर्षी दोन सराव परीक्षा घेण्यात आल्या. शाळा स्तरावर नियमित मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले असून परीक्षेत कोणताही गैरप्रकार झाल्यास कडक कारवाई करण्यात येणार आहे.

# पिंगळवाडे येथे टोमॅटो पीक परिसंवाद उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**जैन फार्म फ्रेश फूड्स (जैन इरिगेशन सिस्टीम्सची उपकंपनी) आणि कागोमे इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टोमॅटो पीक परिसंवाद झाला.**




पिंगळवाडे मुडी रोडवरील प्रगतशील शेतकरी चंद्रकांत पाटील यांच्या शेतात हा कार्यक्रम झाला. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या परिसंवादास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने टोमॅटो उत्पादन वाढवण्यासाठी हा परिसंवाद मार्गदर्शक ठरला.

परिसंवादात टोमॅटो रोपांची योग्य निवड, पूर्व मशागत, ठिबक सिंचनाद्वारे पाणी व्यवस्थापन, फर्टिगेशन आणि ऑटोमेशन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विशेष महत्वाची गोष्ट अशी की, सिक्कीम येथील कृषी विद्यापीठातील फलोत्पादन विषयाच्या २० कृषी अभ्यासकांची ही उपस्थिती होती. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांचे दैवत बळीराजा आणि महाराष्ट्राचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वल करण्यात आले. कागोमे इंडियाचे कृषितज्ज्ञ कल्पेश पाटील यांनी बदलते हवामान आणि उत्पादकता याबद्दल मार्गदर्शन केले. जैन इरिगेशनचे विभागीय व्यवस्थापक डी.एम.बऱ्हाटे यांनी तांत्रिक सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, खते व पाण्याचे काटेकोर नियोजन करणे यासोबतच जमिनीच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. उच्च कृषी तंत्रज्ञान वापरून भरघोस उत्पादन घेण्यासाठी नियोजन करावे असे आवाहन केले. यावेळी श्रीराम पाटील यांनी देखील शेतकऱ्यांशी संवाद साधून कांदा, टोमॅटोचे पीक घ्यावे याबाबत सांगितले. कार्यक्रमाला कागोमे इंडिया जपानचे गुणवत्ता नियंत्रण विभागाचे प्रमुख हेंनरीज शिमुकावा यांनी मार्गदर्शन केले. कागोमे कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक मिलन चौधरी यांनी त्यांच्या भाषणाचे अनुवाद केले. मिलन चौधरी यांनी देखील काही महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.

कंपनीच्या करार शेती विभागाचे प्रमुख गौतम देसर्डा यांनी उपस्थितांशी संवाद साधताना गहू, हरबरा, मकी आणि कपाशी पिकाच्या तुलनेत टोमॅटो आणि कांदा हे पीक अधिक फायद्याचे कसे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. टोमॅटोवर आंतरराष्ट्रीय काम करणाऱ्या कागोमे इंडियाचे भारतात टोमॅटोच्या संशोधन व विकासाबाबत गेल्या १६ वर्षांपासून होणाऱ्या कार्याविषयी मिलन चौधरी यांनी सुसंवाद साधला. काहीही समस्या असतील तर झाडाचा फोटो काढून आमच्याकडे पाठवा. आमच्याकडे पाठवले तर त्यावरील उपाय त्वरेने सुचविले जातील, असेही त्यांनी सांगितले. करार शेती विभागाचे सहकारी श्रीराम पाटील यांनी देखील शेतकऱ्यांशी संवाद साधला. आशुतोष माळी, कंपनीचे वितरक सुरेश इलेक्ट्रिकलचे संचालक श्रीपाल झाबक हे आणि प्रगतशील शेतकरी चंद्रकांत पाटील, डी.डी. पाटील यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सूत्रसंचालन व्हि आर सोळंकी यांनी तर आभार किशोर कुळकर्णी यांनी मानले.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# आदिवासी विकास प्रकल्पाचे एरंडोल येथे उपकार्यालय होणार!

**पालकमंत्र्यांच्या मागणीनुसार राज्यस्तरीय बैठकीत आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांची घोषणा ; ६३.५९ कोटी निधीसह १२५.८७ कोटींचा आराखडा सादर**

प्रतिनिधी । जळगाव

**पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मागणीनुसार आदिवासी विकास प्रकल्पाचे उपकार्यालय एरंडोल येथे सुरू करण्यास आदिवासी विकास विभागाचे मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे चाळीसगाव, एरंडोल, पाचोरा, भडगाव व धरणगाव तालुक्यातील आदिवासी बांधवांना सा मोठा दिलासा मिळणार आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगाव जिल्ह्यासाठी डी जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०२६– २७ साठी किमान ४० कोटी रुपयांचा वाढीव निधी देण्याची ठाम मागणी केली. या मागणीवर ना. अशोक उईके यांनी सकारात्मकता दर्शविली.**



जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०२६–२७ अंतर्गत आज आदिवासी विकास विभागाचे मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक संपन्न झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. राज्यस्तरीय बैठकीत जिल्हाधिकारी रोहन घुगे आदिवासी घटक कार्यक्रम २०२६–२७ जिल्हा विकास आराखड्याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. सन २०२६–२७ साठी जळगाव जिल्ह्यास शासनस्तरावरून ६२.२८ कोटी रुपयांची निधी मर्यादा कळविण्यात आली आहे. मात्र, जिल्ह्यातील विविध कार्यान्वयीन यंत्रणांकडून १२५.८७ कोटी रुपयांच्या मागण्या प्राप्त झाल्या असून सुमारे ६३.५९ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी आवश्यक आहे. चालू आर्थिक वर्षात राबविण्यात आलेले विशेष प्रकल्प तसेच जिल्हा विकास आराखड्यानुसार प्रस्तावित योजनांची माहिती देण्यात आली. जिल्ह्यात मागील वर्षी राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची तसेच पाडा वस्त्यांमध्ये राबविलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्ह्याच्या लोकसंख्येनुसार दरडोई मिळणारा निधी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत वाढ आवश्यक असल्याबाबत सादरीकरणातून निदर्शनास आणून देत मागील काळापासून जळगाव जिल्हा आदिवासी विकास निधीचा शंभर टक्के वापर करण्यात राज्यात अग्रस्थानी असल्याचे त्यांनी बैठकीत नमूद केले. जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता आदिवासी भागातील नागरिकांना सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी एरंडोल येथे उपकार्यालयाची गरज असल्याचे २ वर्षांपासूनची प्रलंबित मागणी असून ६७ पाड्यांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी २२ कोटी, ५१ पाड्यांमध्ये वीज सुविधेसाठी ५.५० कोटी, आदिवासी भागातील सिंचन बंधारेसाठी ४ कोटी, स्मशानभूमी बांधकामासाठी २ कोटी, विद्यार्थ्यांसाठी गरम पाण्याच्या सुविधा व सोलर विद्युतीकरणासाठी ३ कोटी, तसेच आदिवासी भागात सांस्कृतिक भवन उभारणीसाठी ५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली. आदिवासी उपयोजने अंतर्गत सन २०२६–२७ साठी जिल्ह्यासाठी सुमारेकमीत कमी ४० कोटी रुपयांची वाढीव तरतूद करण्याची मागणी केली. या मागणीवर ना. अशोक उईके यांनी सकारात्मकता दर्शविली.

### ➤ सांस्कृतिक भवनासाठी ५ कोटी

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मागणीनुसार ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणचे सांस्कृतिक भवन बांधकामासाठी प्रस्ताव आयुक्तांमार्फत तात्काळ सादर करण्याचे निर्देश देत सांस्कृतिक भवनासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचे आश्वासन दिले. राज्यस्तरीय बैठकीसाठी खासदार स्मिताताई वाघ, आमदार अमोल जावळे, जिल्हधिकारी रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, प्रकल्प अधिकारी अरुण पवार, सहायकवनरक्षक जमीर शेख यांच्यासह संबंधित अधिकारी व्ही.सी.द्वारे उपस्थित होते. सन २०२५–२६ मधील ठळक कामगिरी (आदिवासी घटक कार्यक्रम) १७ शासकीय आश्रमशाळांपैकी १० शाळांमध्ये संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले असून सर्व १७ आश्रमशाळा व १७ शासकीय वसतिगृहांमध्ये १०० टक्के कार्यान्वित करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## रावेर–सावदा रोडवर व्यापाऱ्याला लुटले

**रावेर ।** रावेर–सावदा रस्त्यावरील पारश्या नाल्याजवळ एका ६५ वर्षीय किराणा व्यापाऱ्याला दुचाकीवर बसवून नेले आणि त्यानंतर त्यांच्याकडील रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात अज्ञात तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भररस्त्यात व्यापाऱ्याला लुटल्याच्या या घटनेमुळे रावेर परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. फिर्यादी गोवर्धनदास सफरमल कोटवानी (वय ६५, रा. स्टेशन रोड, रावेर) हे आपला किराणा व्यवसायाचे पैसे जमा करून परतत असताना ही घटना घडली. पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा नोंदवला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील मोरे हे करत आहेत.

## प्रशिक्षण संस्थेत विभागस्तरीय तंत्र प्रदर्शन

**जळगाव ।** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, जळगाव आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय तंत्र प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. हे प्रदर्शन दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० या वेळेत संस्थेच्या प्रांगणात होईल. उद्घाटन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी सीईओ मिनल करनवाल राहतील. कार्यक्रमास प्रमुख अतिथी डॉ. सुहास गाजरे, डॉ.पराग पाटील, संदीप गायकवाड, जितेंद्र जैन, मानस बोरोले, निखील घोलप, संदीप बंब, सागर येवले, दिपक चौधरी उपस्थित राहतील.

## प्रशासन–सामाजिक संघटनांनी अभियान यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा : पालकमंत्री

- अमळनेरमध्ये १९ मार्चपासून संरक्षण अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी । जळगाव

भूमी स्वस्थ राहिली तर समाज स्वस्थ राहील या भावनेतून तंत्रज्ञान आणि श्रद्धेचा सुंदर मेळ साधत शेती – मातीसोबतच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अक्षय कृषी परिवाराच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या भूमी सुपोषण एवं संरक्षण अभियानाचा शुभारंभ १९ मार्च रोजी अमळनेर येथील मंगळग्रह मंदिर परिसरात देशाचे कृषी मंत्री तथा मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते होणार आहे.

या अभियानाच्या निमित्ताने शेती, माती आणि जीवन यावर परिवर्तनात्मक संवाद होणार असून हे अभियान एक व्यापक चळवळ बनावे, यासाठी प्रशासनासोबतच सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी दि. १९ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार अमोल जावळे, अक्षय कृषी परिवाराचे उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम विभाग क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर तसेच मंगळग्रह मंदिर संस्थानचे अध्यक्ष दिगंबर महाले उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब चौधरी यांनी प्रस्ताविकातून अक्षय कृषी परिवारामार्फत देशभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर डॉ. गजानन डांगे यांचा परिचय करून देण्यात आला.





## महाराष्ट्र राज्य आजही शिवरायांच्या विचारांमुळेच टिकून : वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे

प्रतिनिधी । जळगाव

**राज्य मिळवणे सोपे असते. मात्र ते टिकवणे अत्यंत कठीण असते. आजपर्यंत महाराष्ट्र राज्य शिवरायांच्या विचारांमुळेच टिकून असल्याचे प्रतिपादन वस्त्रोद्योग मंत्री तथा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष संजय सावकारे यांनी केले.**

**कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सांस्कृतिक कार्यक्रमात, शहरातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाट्य व सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.**

जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव व सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या विद्यमाने, संभाजी राजे नाट्यगृहात आयोजित शिवजयंती उत्सवनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मंत्री सावकारे बोलत होते.

यावेळी महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश चौधरी उपविभागीय अधिकारी विनय गोसावी, शंभू पाटील, राम पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.

वस्त्रोद्योग मंत्री सावकारे म्हणाले की, शिवरायांचे विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांचे आदर्श आचरणात आणणे हीच खरी कृतज्ञता असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचा आदर केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून संपूर्ण भारतात त्यांना पूज्य मानले जाते. ज्या देवाला आपण पाहिले नाही, त्याची आपण पूजा करतो; परंतु शिवरायांनी प्रत्यक्ष कृतीतून स्वराज्याची संकल्पना साकार करून जनतेला स्वाभिमान दिला. त्यामुळे ते देवपुरुषच आहेत आणि त्यांच्या विचारांमुळेच देश आज एकसंघ राहिला आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शंभू पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन अपूर्वा वाणी यांनी केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची पुनर्बांधणी करा

- अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वात महापौरांना निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

**हरिविठ्ठलनगर, बाजारपेठ परिसरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला दि. ११ जून २०२५ रोजी रात्री आलेल्या जोरदार वादळ–वाऱ्याचा फटका बसला असून स्मारकावरील पत्र्याचे शेड उडून जाऊन मोठे नुकसान झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची पुनर्बांधणी करा,अशी मागणी महापौरांकडे केली आहे.**



या घटनेमुळे स्मारक सध्या उघड्यावर आले असून भविष्यात महामानवांच्या पुतळ्याची विटंबना किंवा अधिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती दुरुस्ती न करता मजबूत व टिकाऊ स्वरूपाचे नव्याने आरसीसी बांधकाम करूनं स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी करीत माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वात मनपाच्या महापौर दीपमाला काळे यांना निवेदन सादर केले. संबंधित प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. स्मारकाचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी आकाश झिने, विद्या झनके, शोभा इंगळे, प्रमिला इंगळे, चंद्रमणी सोनवणे, पूजा इंगळे, कांताबाई झिने, शोभा पाटोळे, प्रशांत इंगळे, आकाश तायडे, आकाश सपकाळे, छाया इंगळे उपस्थित होते.

## कीर्तन श्रवणाने अवघड वाट होते सुकर : गोपाळ महाराज

प्रतिनिधी । भुसावळ



कीर्तन लोकजागृतीचे प्रभावी व सशक्त माध्यम आहे. त्यातील बोधामृताने अवघड वाट सुकर होते. आई वडिलांनी मुलांना किर्तनाचा लळा लावला पाहिजे. संतांचा सहवास जीवन फलदायी करतो, असे मत भडगाव तालुक्यातील लोण पिलांचे येथील किर्तनकार गोपाळ महाराज यांनी केले.

भुसावळात वरणगाव रोडवरील पद्मावती नगरात तीन दिवसीय बिजासनी माता मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा आयोजित केला आहे. त्यानिमित्त कीर्तन महोत्सवात गुरुवारी प्रथम पुष्प गुंफताना ते बोलत होते. गायनाचार्य रामकृष्ण महाराज, मृदंगाचार्य हर्षल महाराज यांनी त्यांना साथसंगत केली. महोत्सव आयोजक पांडुरंग ओंकार पाटील, अलका पाटील, पवन पाटील यांनी किर्तन सेवा देणारे गोपाळ महाराज व साथीदार यांचा सत्कार केला. तत्पूर्वी सायंकाळी पाच वाजता बिजासनी मातेच्या मूर्तीचे आगमन झाले. पद्मावती नगर येथील लाल जैन मंदिर ते हनुमान मंदिर सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. परिसरातील महिला भाविक सहभागी झाले. शिवपूर कन्हाळा येथील माऊली साउंड सिस्टीम यांचे या किर्तन महोत्सवाला सहकार्य लाभले. आयुष्यात कितीही पैसे कमवा पण माय बापाला विसरू नका. लोकभाषा, लोकपरंपरा, लोकसाहित्य जपा. आपल्या म्हणी, उखाणा, ओव्या मोठा अर्थ सांगतात.

## व्होकल फॉर लोकल महोत्सवात घडणार खान्देशी संस्कृतीचे दर्शन

**महापौर दीपमाला काळे यांची माहिती ; नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन**

प्रतिनिधी । जळगाव

**स्थानिक महिला बचत गट, उद्योजक आणि स्वयंसहाय्यता गटांना प्रोत्साहन देण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिका आणि महिला व बालकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खान्देश महोत्सव– २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. व्होकल फॉर लोकल या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव २६ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत सागर पार्क येथे पार पडणार आहे,अशी माहिती महापौर दीपमाला काळे यांनी दिली.**



महोत्सवाचे हे सहावे वर्ष आहे. मनोरंजनाची मेजवानी आणि स्पर्धा – केवळ खरेदीच नव्हे, तर नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध अभिनेता ओम यादव यांच्या उपस्थितीत पैठणी, राणीहार आणि भेटवस्तू जिंकण्याची संधी महिलांना मिळणार आहे. गायक, समूह नृत्य आणि स्थानिक कलावंतांचे सादरीकरण होईल. लहान मुलांसाठी खास गेम झोन आणि जादूगाराचे प्रयोग आयोजित करण्यात आले आहेत. दैनंदिन जीवनातील उपयुक्त वस्तू (मिक्सर, टोस्टर इ.) आणि उत्कृष्ट स्टॉल धारकांचा गौरव केला जाणार आहे.

महापौर दीपमाला काळे यांनी जळगावमधील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या कुटुंबासह या महोत्सवाला भेट द्यावी आणि स्थानिक महिला बचत गटांच्या उत्पादनांना खरेदीद्वारे पाठबळ द्यावे. तसेच या महोत्सवामध्ये प्लॅस्टिकमुक्ती ही थीम घेऊन नागरिकांना कापडी पिशव्या देण्याचे आम्ही नियोजन केले असल्याची माहिती उपमहापौर मनोज चौधरी यांनी यावेळी पत्रकारांना दिली.

### ➤ असे राहील वेळापत्रक

**दि. २६ फेब्रुवारी ते २ मार्च**
**वेळ: सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत.**
**स्थळ: बॅं. निकम चौक, सागर पार्क, जळगाव.**

**या महोत्सवात खान्देशातील संस्कृती, खाद्यपरंपरा आणि हस्तकलेचे दर्शन घडणार आहे. महोत्सवात एकूण १८० स्टॉल्स असणार असून, त्यामध्ये प्रामुख्याने विविध वस्तूंचा समावेश असेल. बचतगटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू. होम अप्लायन्सेस, किचन अप्लायन्सेस आणि इलेक्ट्रॉनिक ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने, ऑफिस आणि होम डेकोरेटिव्ह वस्तू, खान्देशी पद्धतीचे शाकाहारी आणि मांसाहारी अस्सल खाद्यपदार्थ महोत्सवात आहेत.**

## वाळूने भरलेला डंपर पोलिसांनी पकडला; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील म्हसावद येथील रेल्वे उड्डाणपुलावरून वाळूची अवैधपणे वाहतूक करणाऱ्या डंपरवर एमआयडीसी पोलिसांनी दि. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता कारवाई केली. पोलिसांनी वाळूने भरलेले डंपर जप्त केले आहे. याप्रकरणी रात्री ११ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १९ फेब्रुवारी रोजी म्हसावदकडून वावडदाकडे जाणाऱ्या रोडवर रेल्वे उड्डाणपुलाजवळ विना क्रमांकाचा डंपर पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी या डंपरची तपासणी केली असता, त्यात सुमारे ५ ब्रास वाळू विनापरवाना आणि चोरटी वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले. याप्रकरणी पोलिसांनी वाळूचा डंपर ताब्यात घेतला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुभाष साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून डंपर चालक कृष्णा जगन्नाथ पवार वय ४३ रा. हर्सुल परिसर, छत्रपती संभाजी नगर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल समाधान टहाकळे हे करीत आहे.

# अडावद-उनपदेव भोंगऱ्या बाजार उत्सव समिती स्थापन

## आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते होईल भोंगऱ्या बाजाराचे उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अडावद-उनपदेव येथे भोंगऱ्या बाजार उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उत्सव समितीची स्थापना करण्यात आली. संजीव शिरसाठ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून यंदाच्या भोंगऱ्या बाजार उत्सवासाठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.**



समितीच्या अध्यक्षपदी देवसिंग जामसिंग पावरा, उपाध्यक्ष भाया हुलकऱ्या पावरा, सचिव रमेश बारेला यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून रायसिंग पावरा, गाठ्या बारेला, दिलीप बारेला, गजला पावरा, काशिराम पावरा, खुमसिंग सुमजी बारेला, समराबाई पावरा, आमवश्या पावरा (खैऱ्यापानी), सागर पावरा (कुंड्यापाणी), सायसिंग पावरा (तेल्याघाट), संजय बारेला (पानशेवडी), आमाश्या बारेला (मेलाणे) आदींचा समावेश आहे. मार्गदर्शक व सल्लागार म्हणून संजय शिरसाठ व पी.आर. माळी यांची नियुक्ती करण्यात आली.

भोंगऱ्या बाजार उत्सवाचे उद्घाटन प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार लताताई सोनवणे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमृताताई सोनवणे (सदस्य, महिला व बालकल्याण, मनपा जळगाव), डॉ. गौरवदादा सोनवणे (नगरसेवक, मनपा जळगाव), नम्रता पाटील (नगराध्यक्षा, चोपडा), नरेंद्र पाटील (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती), सागरभाऊ ओतारी (मुख्य संपादक, शौर्य मराठी) यांच्यासह विविध गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती समितीतर्फे देण्यात आली.या उत्सवाच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीचे जतन व सामाजिक ऐक्य दृढ करण्याचा संकल्प असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# मुलींनी गरिबीवर मात करत शिक्षणात मजल मारावी : डॉ.प्रा.नयना नवसारीकर

## • अमळनेर लिनस क्लबतर्फे कमला नेहरू मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात साहित्य वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**गोरगरीब, आदिवासी व गरजवंत विद्यार्थिनींना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी शासनाने वसतिगृहांच्या माध्यमातून मोठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या संधीचे सोनं करून विद्यार्थिनींनी स्वबळावर उभे राहून उच्च शिक्षणापर्यंत मजल मारावी व समाजात महिलांची प्रतिमा उंचवावी, असे आवाहन अमळनेर लिनस क्लबच्या कॅबिनेट ऑफिसर डॉ. प्रा. नयना नवसारीकर यांनी केले.**

• चोपडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय संस्था संचलित कमला नेहरू मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. शैक्षणिक प्रवासात अडचणी आल्यास मदतीसाठी पुढे येऊ, असा विश्वासही त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनी संजना डावर, सपना पावरा, रंगीचा बडोले, पूजा बारेला, रोशनी पावरा व सोनू बिलाला यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

यावेळी क्लबतर्फे अंघोळीचे साबण, कपडे धुण्याचे साबण, बासमती तांदूळ, तेल, डाळी, गुलाबजाम तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रसंगी क्लबच्या अध्यक्षा कविता पारख, माजी जिल्हाध्यक्ष कांचन शहा, जास्मिन भरुचा (के अर फॉर गर्ल्स वुमेन पॉवर्स), परमेंद्र कारला, संस्था अध्यक्ष महेश पी. शिरसाठ, पत्रकार छोटू वारडे, अधीक्षिका कावेरी कोळी, कर्मचारी वर्ग व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




## थोडक्यात

### विजेचा धक्का बसून तरूणाचा मृत्यू

**यावल ।** भूषण अनिल सोनवणे (वय २६ रा. डोंगर कठोरा ता. यावल) असे मृत तरुणाचे नाव आहे. गावात पाण्याचे नळ आल्याने भूषण हा पाणी भरण्यासाठी घरात असलेली इलेक्ट्रीक मोटार चालू करण्यासाठी गेला असता त्याला विजेचा जोरदार धक्का बसल्याने तो बाथरूममध्ये फेकला गेला. त्याला नातेवाईकांनी तातडीने यावल ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी अंती मृत घोषीत केले. याबाबत पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### तरुणाची विषप्राशन करून आत्महत्या

**जळगाव ।** ज्ञानेश्वर गहिनीनाथ नालकोट (वय ३३, रा. रामेश्वर कॉलनी) याने १४ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी विषारी औषध प्राशन केले होते. ही बाब लक्षात येताच तातडीने उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (जिल्हा रुग्णालय) दाखल केले. ज्ञानेश्वर यांच्यावर गेल्या पाच दिवसांपासून अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. गुरुवारी सकाळी १०:२४ वाजता उपचार सुरू असतानाच त्याचा मृत घोषित केले.

# पंकज विद्यालयात कॉपीमुक्त परीक्षेचा संकल्प; इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

प्रतिनिधी । चोपडा

**येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा २५ व्या बॅचचा शुभेच्छा व निरोप समारंभ उत्साहात पार पडला.**




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश राणे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून तज्ञ मार्गदर्शक डॉ. आधार पानपाटील उपस्थित होते. डॉ. पानपाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तंत्रज्ञानाच्या युगात करिअरच्या विविध आधुनिक वाटांचा विचार करण्याचे आवाहन केले. डॉक्टर व अभियंता यांच्यापुरतेच करिअर मर्यादित नसून अनेक संधी उपलब्ध आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. इयत्ता १० वीची परीक्षा ही जीवनातील अंतिम नव्हे, तर अनेक परीक्षांपैकी एक टप्पा असल्याचे सांगत यश-अपयशाचा समतोल राखत स्वतःच्या करिअरची दिशा ठरवावी, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन आर. के. माने यांनी तर यशस्वीतेसाठी पी. सी. पाटील, व्ही. ए. निकम व सर्व शिक्षक-कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# नायगाव जि.प. शाळेत 'रंगतरंग' कार्यक्रम उत्साहात

## शताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांनी केली कलागुणांची उधळण

प्रतिनिधी । चोपडा

**नायगाव( ता. यावल) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या शताब्दी वर्षानिमित्त 'रंगतरंग' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित कार्यक्रमाला ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**




कार्यक्रमाचे उद्घाटन नूरजहाँ सरफराज तडवी (सरपंच, नायगाव) व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष फिरोज कलिंदर तडवी यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून संजीव सिताराम शेटे मी(प्रभारी केंद्रप्रमुख, किनगाव), मनोज देशमुख (पोलीस पाटील, नायगाव), वृषाली निलेश पाटील (उपसरपंच, नायगाव) तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. 'रंगतरंग'कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सुमारे ४० विविध नृत्य प्रकारांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर, लोककला, आदिवासी संस्कृती व सामाजिक संदेश देणाऱ्या नृत्यांमधून विद्यार्थ्यांनी कौशल्याची छाप पाडली. यावेळी गावातील ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलमध्ये शिवजयंती साजरी

प्रतिनिधी । चोपडा

**निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू... या ओवीप्रमाणे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त चोपडा येथील पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वराज्याचे प्रेरणादायी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने साजऱ्या करण्यात आलेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.**



कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य मिलिंद पाटील यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी समन्वयक उपमा जैस्वाल व समन्वयक शारदा अहिरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित प्रभावी भाषणे सादर करत स्वराज्याचा अभिमान जागवला. पराक्रमाच्या गाथा सांगणाऱ्या जोशपूर्ण पोवाड्यांनी सभागृह दणाणून गेले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. तर वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या लेझीम सादरीकरणाने देशभक्तीची भावना जागवली. कार्यक्रमाचे सुबक व प्रभावी सूत्रसंचालन शुभांगी पाटील यांनी केले. लेझीम नृत्यासाठी मानसिंग वळवी यांचे मार्गदर्शन लाभले. संपूर्ण कार्यक्रमात शिवभक्ती, राष्ट्रप्रेम आणि स्वराज्याच्या विचारांची प्रेरणादायी अनुभूती मिळाली. जयंतीनिमित्त संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश पंडित बोरोले, संस्थाध्यक्ष पंकज बोरोले तसेच उपाध्यक्ष अविनाश राणे यांनी शिक्षक, विद्यार्थी व पालकांना शुभेच्छा देत शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दोन विशेष रेल्वे गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ

प्रतिनिधी । भुसावळ

भुसावळ आणि दादर दरम्यान चालविण्यात येत असलेल्या ०२ विशेष गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९०४९/०९०५० दादर - भुसावळ (त्रि-साप्ताहिक) विशेष गाडी क्रमांक ०९०४९ दादर - भुसावळ विशेष सेवा दि. २७ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९०५० भुसावळ - दादर विशेष सेवा दि. २७ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९०५१/०९०५२ दादर - भुसावळ (त्रि-साप्ताहिक) विशेष गाडी क्रमांक ०९०५१ दादर - भुसावळ विशेष सेवा दि. २८ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९०५२ भुसावळ - दादर विशेष सेवा दि. २८ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. वरील विशेष गाड्यांच्या वेळापत्रकात, थांब्यांमध्ये व रचनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्रवाशांनी या विशेष गाडी सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०९०५० व ०९०५२ साठीचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर सुरू केले आहे.

# चोपडा महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात; विचारांचे स्मरण, पदयात्रेने स्मारकाला अभिवादन

प्रतिनिधी । चोपडा

**महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा येथे इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण व पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले.**




संस्थेचे अध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील व सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. आर. एम. बागुल होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. एस. ए. वाघ, प्रमुख वक्ते डॉ. आर. आर. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य पी. एस. पाडवी तसेच रजिस्ट्रार डी. एम. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख श्रीमती एस. बी. पाटील यांनी करत शिवजयंतीची पार्श्वभूमी स्पष्ट केली.

विद्यार्थिनी प्रगती चव्हाण हिने शिवरायांच्या जीवनावर मनोगत व्यक्त करत शिवगर्जना केली, तर जागृती बारी हिने पोवाड्याचे प्रभावी सादरीकरण केले. या सादरीकरणाबद्दल प्रा. डॉ. बी. एम. सपकाळ यांनी रु. २०० रोख पारितोषिक देऊन गौरव केला.

प्रमुख वक्ते डॉ. आर. आर. पाटील यांनी शिवरायांच्या जन्मापासून स्वराज्य स्थापनेपर्यंतच्या घटनांचा आढावा घेत त्यांच्या दूरदृष्टी, संघटनकौशल्य व सर्वधर्मसमभावी नेतृत्वगुणांवर प्रकाश टाकला.

डॉ. एस. ए. वाघ यांनी शिवरायांनी लोकांमध्ये निर्माण केलेली ङ्गराज्य आपलेफ ही भावना अधोरेखित केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. आर. एम. बागुल यांनी आजच्या पिढीने शिवचरित्राचे अभ्यासपूर्ण वाचन करावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन सौ. सुनंदा नन्नवरे यांनी केले तर आभार संदीप पाटील यांनी मानले. अभिवादनानंतर सर्वांनी चोपडा येथील शिवाजी महाराज स्मारकापर्यंत पदयात्रा काढून शिवरायांना अभिवादन केले.

# गर्जना पत्रकार संघातर्फे बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी

## • आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना पत्रकारांनी केले विनम्र अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

**आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज जळगाव जिल्ह्यात गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात जांभेकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करण्यात आले.**



- नरेंद्र कदमांनी केले प्रतिमा पूजन
- सागरभाऊ ओतारी यांनी जांभेकरांचा जीवनपट उलगडला

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक म्हणून ओळखले जाणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सामाजिक प्रबोधनासाठी ङ्गदर्पणफ हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने, गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज संघटनेच्या कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम यांनी, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेतील मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. जांभेकर यांनी सामाजिक सुधारणेसाठी पत्रकारितेचा पाया रचला, तोच वारसा आपण जपला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. संस्थापक महासचिव भगवान सोनार यांनी, जांभेकर यांच्या अष्टपैलू व्यक्तित्वाची आणि त्यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली. केंद्रीय कार्याध्यक्ष सागर ओतारी यांनी ग्रामीण भागातील पत्रकारांसमोरील आव्हाने आणि जांभेकर यांच्या विचारांची आजच्या काळातील सुसंगतता यावर मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष चेतन वाणी यांनी, आचार्य जांभेकर यांनी दाखवलेल्या सत्य आणि निपक्षपाती पत्रकारितेच्या मार्गावर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे सांगितले.

या प्रसंगी संघटनेचे संस्थापक खजिनदार ललित खरे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष दीपक कुलकर्णी, जिल्हा कार्याध्यक्ष हेमंत पाटील, उपाध्यक्ष वसीम खान, शहराध्यभ जितेंद्र कोतवाल, प्रसिद्धी प्रमुख विश्वजीत चौधरी, लालचंद अहिरे, सुभाष गोळेसर, विकास चव्हाण, हेमंत शर्मा, मनोज जोगी, किशोर शिंपी, अमोल पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प यावेळी पत्रकारांनी केला. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील पत्रकार वर्गात एकीची भावना निर्माण झाली असून, आद्य पत्रकारांच्या स्मृतींना उजाळा मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे.